(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचे मराठी भाषांतर)

(२०२३) ४ एस. सी .आर. ९१६

यमल मनोजभाई

वि.

भारतीय संघराज्य आणि इतर

(रिट याचिका (फौजदारी) क्रमांक ५५/२०२३)

मे ०४, २०२३

(न्यायमूर्ती कृष्णा मुरारी आणि न्यायमूर्ती संजय करोल)

सीमा शुल्क कायदा १९६२ - कलम १२३ आणि कलम १२७ बी - कलम १२३ अंतर्गत निर्दिष्ट केलेल्या जप्त वस्तू, कलम १२७ बी अंतर्गत सेटलमेंटचा उपाय (समझोत्याचा उपाय) जर उपलब्ध असेल - निर्णय दिला- न्यायमूर्ती कृष्णा मुरारीद्वारे. सीमाशुल्क अधिकारक्षेत्रातील जप्तीच्या प्रकरणांमध्ये कलम १२३ लागू होऊ शकत नाही आणि आरोपीस सेटलमेंटच्या उपायाचा हक्क आहे - मुंबई उच्च न्यायालयाने सुरेश रहेजा या प्रकरणामध्ये दिलेला निर्णय कायद्याची योग्य स्थिती दर्शवितो - न्यायमूर्ती संजय करोलद्वारे , कलम १२७ बी(१) चे परंतुक वस्तूंच्या काही श्रेणी निर्दिष्ट करते ज्या सेटलमेंट कमिशनच्या अधिकारक्षेत्रापासून प्रतिबंधित केलेल्या आहेत, ज्यात कलम

१२३ मध्ये नमूद केलेल्या वस्तू आणि एनडीपीएस कायद्याशी संबंधित वस्तू यांचा समावेश आहे. अशाप्रकारे कलम १२३ अंतर्गत प्रगणित केलेल्या वस्तूंच्या संदर्भात सेटलमेंट साठी कलम १२७ बी लागू होणार नाही - मतभिन्नतेच्या दृष्टिकोनातून प्रकरण भारताचे मुख्य न्यायाधीश यांच्यासमोर योग्य आदेशांसाठी सादर करावयाचे आहे - भारतीय राज्यघटना - अनुच्छेद २१.

भारतीय संघराज्य विरुद्ध सुरेश रहेजा आणि इतर **२०११(२६७) इ. एल. टी. ४८७ (बीओएम) - मान्य केले.**

लीलावती बाई विरुद्ध मैसूर राज्य **एआयआर १९५७ एस सी ५२१ : (१९५७) एससीआर ७२१ - संदर्भित.**

अतिरिक्त आयुक्त, सीमा शुल्क विरुद्ध रामनिवास वर्मा **२०१५ एसएससी ऑनलाईन डीईएल ११५४२;** सीमा शुल्क आयुक्त विरुद्ध अविनाश दावर आणि दुसरा **२०१५ एसएससी ऑनलाईन डीईएल १३८७५;** सीमा शुल्क आयुक्त विरुद्ध ज्योत्स्ना चिकेरसल आणि दुसरा **२०१९ एसएससी ऑनलाईन डीइएल ६५७४;** अतिरिक्त आयुक्त, सीमाशुल्क विरुद्ध अशोक कुमार **२०१६ (३३६) इ.एल.टी. २२४ (डी इ एल);** टाटा टेली सर्विसेस (महाराष्ट्र) लिमिटेड विरुद्ध भारतीय संघराज्य २००**६ (२०१) इ एल टी ५२९ (बी ओ एम) - संदर्भित .**

सीमा शुल्क आयुक्त विरुद्ध एम अंबालाल **(२०११) २ एससीसी ७४ :(२०१०) १५**

एससीआर ९३७; नॉर्दन कॉर्पोरेशन विरुद्ध भारतीय संघराज्य**(१९९०) ४ एस सी सी २३९ : (१९९०) ३ एससीआर ६२१; दलिप** सिंग विरुद्ध युपी राज्य आणि इतर **(२०१०) २ एसएससी ११४ : (२००९) १६ एस सी आर १११ - संदर्भित.**

भारतीय संघराज्य विरुद्ध सुरेश रहेजा **२०११ (२६७) इ. एल .टी. ४८७ (बी ओ एम) ;** अतिरिक्त आयुक्त सीमा शुल्क विरुद्ध रामनिवास वर्मा **२०१५ एस सी सी ऑनलाइन डीइएल ११५४२;** सीमाशुल्क आयुक्त विरुद्ध अविनाश दावर आणि दुसरा **२०१५ एसएससी ऑनलाईन डी ई एल १३८७५;** सीमा शुल्क आयुक्त विरुद्ध ज्योत्स्ना चिकेरसल आणि दुसरा **२०१९ एसएससी ऑनलाईन डी ई एल ६५७४;** सीमा शुल्क आयुक्त विरुद्ध अशोक कुमार जैन **२०१३(२९२) इ एल टी ३२ (डी इ एल) - संदर्भित**

<u>**प्रकरण विधी संदर्भ**</u>

न्यायमूर्ती कृष्णा मुरारी , यांच्या न्यायनिर्णयात

(१९५७) एससीआर ७२१	**संदर्भित**	**परिच्छेद ४०**

न्यायमूर्ती संजय करोल यांच्या , न्यायनिर्णयात

(२०१०) १५ एससीआर ९३७	**संदर्भित**	**परिच्छेद ३**

(१९९०) ३ एससीआर **संदर्भित** **परिच्छेद ३०**

६२१

(२००९) १६ एससीआर **संदर्भित** **परिच्छेद ३१**

१११

व्ही.एस.नणकणी, वरिष्ठ वकील आशिष बत्रा, याचिका कर्त्यांचे वकील.

के.एम.नटराज, एन वेंकटरमण, एएसजी वत्सल जोशी, राघव शर्मा, रजत शर्मा, ए.के.शर्मा, मुकेश कुमार मरोरिया व्ही.सी. भारथी, रुपेश कुमार, एच. आर. राव, ए.के. कौल, रणजीत कांत, मिस आकांक्षा कौल, उत्तरवादींचे वकील.

न्यायालयाचे न्यायनिर्णय* **न्यायमूर्ती कृष्णा मुरारी** यांनी दिले .

१. भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ३२ अन्वये दाखल करण्यात आलेली प्रस्तुतची रिट याचिका सीमाशुल्क कायदा,१९६२ अंतर्गत आरोपीच्या अधिकाराबाबत, भारतीय राज्यघटनेच्या कलम २१ अंतर्गत असलेले वैयक्तिक स्वातंत्र्याचे प्रचंड महत्त्व हा मुद्दा उपस्थित करते (यापुढे सीमाशुल्क कायद्याच्या अध्याय XIV A अंतर्गत समाविष्ट

---

*ईडी टिपणी : माननीय श्री न्यायमूर्ती कृष्णा मुरारी आणि माननीय श्री. न्यायमूर्ती संजय करोल, यांनी घोषित केलेल्या वेगळ्या न्यायनिर्णयांच्या बाबतीत मतभिन्नतेच्या दृष्टिकोनातून, प्रकरण भारताचे मुख्य न्यायाधीश यांच्यासमोर योग्य आदेशांसाठी सादर करण्यासाठी निर्देशित करण्यात आले होते.

असलेल्या तरतुदींनुसार विवादाचे निराकरण करण्यासाठी ' सीमाशुल्क कायदा ' म्हणून संबोधले जाईल)

२. रिट याचिकाकर्ता,जो अनिवासी भारतीय आहे (थोडक्यात, 'एनआरआय') त्याला ०४.१०.२०२२ रोजी दिल्ली आंतरराष्ट्रीय विमानतळावर अटक करण्यात आली होती. उत्तरवादीचे प्रकरण असे आहे की, याचिकाकर्त्याने उच्च मूल्याच्या वस्तूंची विशेषतः घड्याळे यांची तस्करी,त्यावर शुल्क भरण्यापासून वाचण्यासाठी मुख्यतः ग्रीन चॅनेलच्या प्रवेशद्वारातून करण्याचा प्रयत्न केला होता.

३. याचिकाकर्त्याने सीमाशुल्काद्वारे मालाची तस्करी करण्याचा प्रयत्न केल्याच्या संशयावरून,याचिकाकर्त्याच्या व्यक्तीची आणि त्याच्या सामानाची तपशीलवार तपासणी करण्यात आली होती आणि त्यातून सात मनगटी घड्याळांसह इतर काही उच्च मूल्याच्या वस्तू जप्त करण्यात आल्या होत्या. याचिकाकर्त्याने सीमाशुल्क कायद्याच्या कलम १३२ आणि १३५ अंतर्गत गुन्हा केल्याचे दिसून आल्याने, त्याला ०५.१०.२०२२ रोजी अटक करण्यात आली होती. अटक केल्यानंतर, यातील याचिकाकर्त्याने त्यानंतर प्रस्तुतची रिट याचिका दाखल केली, ज्यामध्ये त्याने त्याला घरी शिजवलेले जेवण देण्याच्या परवानगीसाठी निर्देश जारी करण्याची मागणी केली.

४. याचिकाकर्ता, अनिवासी भारतीय असल्याने, ०६.१०.२०२२ पासून भारताबाहेर प्रवास करण्यास अक्षम आहे आणि म्हणून सीमाशुल्क कायद्याच्या कलम

१२७ अंतर्गत सेटलमेंट कमिशनकडे जाऊन, थकबाकी आणि त्यावर भरावयाचे व्याज कायद्यानुसार सीमाशुल्क विभागाकडे भरून विवाद सोडवण्यास सक्षम आहे. तथापि, सेटलमेंट प्रक्रिया सुरू करण्यासाठी सीमाशुल्क अधिकाऱ्याद्वारे नोटीस नको म्हणून, याचिकाकर्त्याने तशी मागणी करणारा आय ए (खटल्याच्या कारवाई दरम्यान केलेला अर्ज) दाखल केला.

५. याचिकाकर्त्याने दाखल केलेल्या उपरोक्त आयए मध्ये, या न्यायालयाने दिनांक २०.०२.२०२३ रोजी एकतर्फी आदेश पारित केला होता, ज्यामध्ये सीमाशुल्क आयुक्तांना, कार्यवाही सुरू करण्यासाठी याचिकाकर्त्याला कारणे दाखवा नोटीस जारी करण्याचे निर्देश दिले गेले होते.

६. उत्तरवादीने नंतर, वर नमूद केलेला एकतर्फी आदेश मिळाल्यावर, सदर आदेश परत मागवण्यासाठी अर्ज दाखल केला. या प्रकरणाच्या सुनावणीसाठी, सेटलमेंट कमिशनच्या अधिकारक्षेत्राच्या मुद्द्यावर अनेक कारणे उपस्थित करण्यात आली. दोन्ही पक्षांची लांबलचक सुनावणी झाली आणि २०.०२.२०२३ च्या आदेशानुसार, हा एकतर्फी आदेश परत मागवण्यात आला होता.

७. या न्यायालयाने पारित केलेला सदर एकतर्फी आदेश परत मागवल्यानंतर, दोन्ही पक्षांनी गुणवत्तेवर लांबलचक युक्तिवाद केला. युक्तिवादाच्या दरम्यान, मुंबई उच्च न्यायालय आणि दिल्ली उच्च न्यायालयाच्या दोन न्यायनिर्णयांमधील स्पष्ट

विरोधाभास (परस्परविरोधी) याचिका कर्त्याद्वारे, अतिरिक्त कारणे, कागदपत्रे आणि विनंतींद्वारे आमच्या निदर्शनास आणून देण्यात आला. दोन्ही पक्षांच्या विद्वान वकिलांनी गुणवत्तेवर या प्रकरणाचा अधिक युक्तिवाद केला आणि त्यानंतर न्यायनिर्णय राखून ठेवण्यात आला होता.

८. जेव्हा उच्च न्यायालयाच्या दोन न्यायनिर्णयांमधील उपरोल्लेखित विरोधाभास आमच्या निदर्शनास आणून देण्यात आला, तेव्हा याचिकाकर्त्याच्या वतीने उपस्थित असलेल्या विद्वान वकिलांनी आमच्या निदर्शनास आणून दिले की, उच्च न्यायालयाच्या दोन निकालांमधील असा विरोधाभास लक्षात न घेतल्यास,त्यात सीमाशुल्क कायद्यांतर्गत आरोप असलेल्या आरोपींना मोठी हानी पोहोचवण्याची आणि त्यांना तोडगा काढण्याच्या अधिकारापासून वंचित ठेवण्याची क्षमता आहे.

<u>विश्लेषण</u>

९. सीमाशुल्क कायद्यांतर्गत सेटलमेंटचा मुद्दा , ज्याची आमच्याद्वारे खाली तपशीलवार चर्चा केली जाईल, त्याला सीमाशुल्क कायद्याच्या कलम १२७ (एच) अंतर्गत तरतुदीनुसार, आरोपीला खटला आणि दंडापासून मुक्तता मिळविण्यासाठी एक उपाय प्रदान करण्याचा अधिकार आहे. जर तो अधिकार संदिग्धतेच्या संशयाखाली राहिला तर तो आरोपी व्यक्तींना, तुरुंगवासाची भीती न बाळगता सन्मानपूर्वक जीवन जगण्यासाठी मिळालेल्या मूलभूत अधिकारांना हानीच पोहोचवणार नाही तर विनाकारण काही

आरोपींना कोठडी कमी झाल्यानंतर बाहेरील मुक्त जीवनापासून वंचित ठेवण्यासही भाग पाडू शकतो. तसेच अशा परिस्थितीत, समान तथ्ये आणि परिस्थितींसह समान प्रकरणांमध्ये भिन्न निर्णय घेणाऱ्या अधिकाऱ्यांकडून विरुद्ध मते घेतली जाऊ शकतात.

१०. सीमाशुल्क कायद्याच्या अध्याय XIV A द्वारे शासित असले असलेले सेटलमेंट कमिशन, वित्त (क्रमांक २) कायदा, १९९८ (१९९८ चा कायदा क्रमांक XXI) च्या कलम १०२ च्या आधारे, कर गुन्हेगारांनी केलेल्या प्रकटीकरणाद्वारे (खुलासा) कर चुकवेगिरीच्या समस्यांचे निराकरण करण्याच्या उद्देशाने घातला गेला. असा खुलासा प्रामाणिकपणे केल्यास, कर चुकवणाऱ्याला दंड किंवा शिक्षेपासून मुक्ती मिळू शकते. पहिल्या दृष्टीक्षेपात, असे दिसते की अशा तरतुदीमुळे गुन्हेगारांना दंडात्मक परिणामांपासून दूर राहता येते आणि सरकारला कोणताही फायदा होत नाही, तथापि, तरतुदींचे सखोल विश्लेषण अन्यथा सिद्ध होईल. इतर गुन्ह्यांप्रमाणे कर गुन्हेगारांद्वारे कर रोखणे, देशाच्या महसुलावर थेट परिणाम करते. तसेच, अशा विवादांवरून उद्भवलेल्या गुंतागुंतीमुळे, त्याच्या निर्णयासाठी अनेकदा बराच वेळ लागतो. अशा परिस्थितीत, ज्यामध्ये कर विवाद सोडवण्यासाठी लागणारा बराच वेळ थेट महसुलावर आणि परिणामी देशाच्या कल्याणावर परिणाम करतो. विधीमंडळाला फायदेशीर आणि वेळ वाचवणारा उपाय लागू करणे अत्यावश्यक वाटले, जे सरकारला केवळ देय कराच्या रकमेवर पुन्हा दावा करण्यास मदत करत नाही तर व्यक्तींना असे करण्यास प्रोत्साहनही देते. या विचारांतूनच सेटलमेंट कमिशनचा जन्म झाला, आणि म्हणूनच, सेटलमेंट

कमिशनच्या अधिकारक्षेत्राच्या मुद्द्यांवर निर्णय देताना ही पार्श्वभूमी नेहमी लक्षात ठेवली पाहिजे.

प्राथमिक आक्षेप

११. सुनावणी दरम्यान, उत्तरवादीच्या वतीने उपस्थित असलेल्या विद्वान वकिलाने प्राथमिक आक्षेप नोंदवला आहे की, मागितलेला मूळ दिलासा हा खटल्यातील कैद्यांना घरी शिजवलेले जेवण देण्यापुरता मर्यादित असल्याने, हे न्यायालय कायद्याच्या सध्याच्या प्रश्नावर निर्णय घेण्यासाठी आणि उच्च न्यायालयाच्या दोन निकालांमधील विरोधाभास सोडवण्यासाठी योग्य मंच नाही.

१२. प्रस्तुतच्या खटल्यात, वर नमूद केल्याप्रमाणे,दोन्ही पक्षांच्या वतीने उपस्थित असलेल्या विद्वान वकिलांनी खटल्याच्या गुणवत्तेवर आणि प्रश्नातील कायद्याच्या मुद्द्यावर लांबलचक युक्तिवाद केला आहे. दोन उच्च न्यायालयांच्या विरोधाभासी निर्णयांमुळे उद्भवलेल्या कायद्याच्या अस्पष्ट मुद्द्यातील या संदिग्धतेमुळे सध्या अशाच प्रकारच्या खटल्यांचा सामना करणाऱ्या आरोपींच्या मूलभूत अधिकारांना मोठ्या प्रमाणात हानी पोहोचण्याची शक्यता आहे आणि भविष्यातील आरोपींनादेखील तत्सम खटल्यांना सामोरे जावे लागेल.

१३. अशा परिस्थितीत, ज्यामध्ये पक्षकारांनी आणि न्यायालयाने एवढा वेळ दिला आहे, हे न्यायालय एका अनोख्या स्थितीत बसले आहे, जिथे ती संदिग्धता दूर

करण्यासाठी सर्व आवश्यक ज्ञानाने सुसज्ज आहे. जर ही संदिग्धता दूर करण्याची संधी या न्यायालयाने वापरली नाही, तर असे घडेल की, भविष्यात कधीतरी या न्यायालयाला पुन्हा कायद्याच्या त्याच प्रश्नाचे उत्तर देण्याचे काम सोपवले जाईल, ज्यासाठी, मोठ्या लांबीच्या पूर्वीच्या वेळी हाताळले गेले असते तेच काम पूर्ण करण्यासाठी न्यायालय पुन्हा वेळ घालवेल. न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राचा अशा प्रकारे वापर न केल्याने प्रकरणांच्या प्रलंबिततेवरचा भार तर वाढेलच, शिवाय देशभरातील याचिकाकर्त्यांना आणखी प्रलंबित ठेवता येईल. त्यामुळे या न्यायालयाने या क्षणी न्यायालय आणि भविष्यातील पक्षकारांना कार्यवाहीच्या बहुविधतेपासून वाचवणे आणि अशा संदिग्धतेमुळे झालेला खोडसाळपणा यावर उपाय करणे आवश्यक आहे.

१४. प्राथमिक विनंतीपासून विचलनाच्या कारणास्तव प्रस्तुतच्या रिट याचिकेच्या देखभालक्षमतेचा विचार करता, न्यायनिर्णयांच्या तत्त्वांमध्ये असा निर्णय देण्यात आला की, हे न्यायालय, रिट याचिका अधिकारक्षेत्राखालील, मागितलेल्या सवलतीला बांधील नाही आणि न्यायाच्या टोकाची पूर्तता करण्यासाठी मूळ दिलासाच्या पलीकडे जाऊ शकत नाही. तसेच जिथे दोन उच्च न्यायालयांमध्ये कायदेशीर मुद्द्यावर मतभिन्नता निर्माण होते तेथे भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करण्याच्या मार्गात केवळ तांत्रिक आक्षेपांना परवानगी दिली जाऊ शकत नाही .

१५. कलम ३२ ला इतके महत्त्व देण्याचे कारण हे आहे की राज्य एक अवयव

(संस्था) आहे आणि म्हणून जर त्याला नियंत्रण आणि संतुलनाशिवाय सोडले तर त्याची एक अत्याचारी संस्था बनण्याची क्षमता आहे जी आपल्या लोकांच्या नागरी आणि वैयक्तिक स्वातंत्र्यांना गृहीत धरू शकते. राज्याच्या मुळाशी असलेल्या या प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी, घटनात्मक योजनेत राज्य यंत्रणेतील एक अवयव, म्हणजे न्यायिक संस्था, ज्याला राज्याच्या जुलमी प्रवृत्तींमध्ये हस्तक्षेप करण्याचे अधिकार दिलेले आहेत. हे अवयव, सर्वोच्च न्यायालयाचे प्रमुख असूनही, मूलभूत अधिकारांच्या उल्लंघनाच्या प्रकरणांमध्ये, राज्यांतर्गत कार्य करत असले तरी, त्याविरुद्ध देखील लढा दिला जातो.

१६. पुढे, भारतीय राज्यघटनेने प्रदान केलेल्या इतर सर्व अधिकारांमध्ये, नागरी आणि वैयक्तिक स्वातंत्र्यांना सर्वोच्च स्थान दिले आहे. हे नागरी आणि वैयक्तिक स्वातंत्र्य, जे राज्याविरुद्ध तलवार आणि ढाल म्हणून काम करतात, त्यांचे भाषांतर राज्यघटनेच्या भाग III द्वारे आदर्श ते लागू करण्यायोग्य अधिकारांमध्ये आढळते.

१७. राज्यघटनेच्या भाग III अंतर्गत असा एक अधिकार, जो आपल्या लोकांना राज्याच्या जुलूमशाहीपासून संरक्षण देतो, तो म्हणजे राज्यघटनेचा अनुच्छेद ३२, जो स्वतःच राज्य घटनेच्या भाग III मध्ये येणारा एक मूलभूत अधिकार आहे, जो इतर मूलभूत अधिकारांच्या संरक्षणासाठी अस्तित्वात आहे. अनुच्छेद ३२ नुसार एखाद्या व्यक्तीच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करणारी किंवा नागरी किंवा वैयक्तिक स्वातंत्र्याला हानी पोहोचवणारी राज्याची कोणतीही कृती न्यायालयाच्या छाननीच्या

कक्षेत आहे.

१८. राज्यघटनेच्या सभेच्या चर्चेदरम्यान, जेव्हा अनुच्छेद ३२ च्या कार्यक्षेत्राचा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता, जो त्यावेळचा राज्यघटनेच्या मसुद्याचा अनुच्छेद २५ होता , तेव्हा राज्यघटनेच्या निर्मात्यांनी या अनुच्छेदाच्या व्याप्तीवर आणि त्याच्या अधिकाराच्या व्याप्तीवर विस्तृतपणे विचारमंथन केले. या वादविवादांदरम्यान डॉ. बी.आर. आंबेडकर यांनी अतिशय प्रसिद्धपणे सांगितले की, अनुच्छेद ३२ हा संविधानाचा आत्मा आहे. डॉ. बी.आर. आंबेडकर यांनी म्हटलेले येथे उद्धृत करण्यात येत आहे :-

> "आता महोदय, मला खूप आनंद झाला की या अनुच्छेदावर बोलणाऱ्यांपैकी बहुतेकांना या अनुच्छेदाचे महत्त्व कळले आहे. जर मला या राज्यघटनेतील कोणत्याही विशिष्ट अनुच्छेदाचे नाव सर्वात महत्त्वाचे म्हणून द्यायला सांगितले गेले - असा अनुच्छेद ज्याशिवाय हे संविधान रद्दबातल ठरेल- मी या अनुच्छेदाशिवाय इतर कोणत्याही अनुच्छेदाचा संदर्भ देऊ शकत नाही. हा संविधानाचा आत्मा आहे आणि त्याचे हृदय आहे आणि मला आनंद आहे की सभागृहाला त्याचे महत्त्व कळले आहे.

१९. तसेच, फादर जेरोम डिसोझा, राज्यघटना सभेचे सदस्य, यांनी भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ३२ च्या महत्त्वावर भर देताना खालीलप्रमाणे नमूद केले:-

“मला सभागृहाचे लक्ष वेधून घ्यायचे आहे, महोदय, या अनुच्छेदाच्या परिणामाकडे, संभाव्यत: पहिल्या वाचनात स्पष्ट नसलेले परिणाम. हे सदन आणि या सदनाद्वारे भविष्यात या देशावर राज्य करणारी कायदेमंडळे, स्व-नकार किंवा स्व-निषेध करण्याच्या प्रशंसनीय आणि महत्त्वपूर्ण कृतीद्वारे,सर्वोच्च न्यायपालिकेच्या अधिकाराखाली काही कायदे आणि काही तत्त्वांची अंमलबजावणी करतात, आणि त्यांना पुढील वर्षांमध्ये निवडल्या जाणाऱ्या संसदेच्या कक्षेतून आणि नियंत्रणातून काढून टाका. त्यांना हे अधिकार हल्ला किंवा बदल होण्याच्या शक्यते पलीकडे ठेवायचे आहेत कारण ते या राज्यघटनेत नंतर दिलेल्या रीतीने नियुक्त केलेल्या न्यायाधीशांच्या अखत्यारित आणून पक्षीय राजकारणातील उत्कटतेने आणि उलट सुलट घटनांनी आणले जाऊ शकतात. महोदय , कारण आपण सर्व मानतो की मूलभूत अधिकारांच्या या अध्यायाचा अर्थ असा आहे की - माणसाला काही हक्क आहेत जे अपरिहार्य आहेत, ज्यावर मानवी रीतीने स्थापन केलेल्या कोणत्याही विधिमंडळ अधिकाऱ्याद्वारे प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ शकत नाही, की हे मूलभूत अधिकार अशाप्रकारे तयार केले गेले आहेत आणि सर्वोच्च न्यायालयात अपील करण्यासाठी या तरतुदीद्वारे त्यांना परवानगी आणि संरक्षण दिले गेले आहे.

मी म्हटल्याप्रमाणे, महोदय , याचा तात्पर्य असा आहे की एखाद्या व्यक्तीला त्याच्या गरजा, त्याचे हक्क, त्याच्या हक्कांची पूर्णपणे कदर नसलेल्या लोकांच्या

सामूहिक कृतीपासून देखील संरक्षित केले गेले पाहिजे आणि वैयक्तिक व्यक्तिमत्त्वाची पवित्रता, त्याच्या सदविवेकबुद्धीचे दावे, मी सांगण्याचा प्रयत्न करतो तत्त्वज्ञानावर, जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन जो मूलत: आध्यात्मिक आहे त्यावर आधारित आहे. महोदय, जर आपले सर्व लोक आणि त्यांचा दृष्टीकोन पूर्णपणे भौतिकवादी असेल, बरोबर-अयोग्य हे बहुमताच्या मताने ठरवायचे असेल, तर मूलभूत अधिकारांना आणि त्यांना उच्च न्यायालयाच्या संरक्षणाखाली ठेवण्याला काहीही महत्त्व नाही. लोकशाहीच्या पूर्ण आणि अविभाज्य व्याख्येमध्ये व्यक्तीचे, त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे आणि त्याच्या सद्सद्विवेकबुद्धीचे दावे यांचा समावेश होतो आणि त्यावर आधारित आहे, असे आमचे मत आहे.

तसेच मी म्हणतो, महोदय, शेवटच्या विश्लेषणात आपल्याला नैतिक कायद्याद्वारे आणि नैतिक कायद्याद्वारे सर्वोच्च व्यक्तीकडे अपील करावे लागेल, जर सर्वोच्च आणि पूर्ण अधिकार द्यायचा असेल आणि सर्वात स्थिर मंजुरी या मूलभूत अधिकारांसाठी मिळवायची असेल तर महोदय, महात्मा गांधींनी त्यांच्या एका अविस्मरणीय वाक्प्रचारात धर्मनिरपेक्ष राज्यघटना असावी आणि त्यामध्ये परमात्म्याचे नाव टाळावे या इच्छेचा संदर्भ देत मोठ्याने ओरडले, “तुम्ही नाव बाहेर ठेवू शकता, परंतु तुम्ही बाहेर ठेवणार नाही. त्या संविधानातील गोष्ट”. आणि, महोदय, माझा असा विश्वास आहे की हे मूलभूत अधिकार आणि त्यांचे परिणाम खरोखरच कबुली देण्यासारखे आहेत की मानवी एजन्सी आणि मानवी

विधानमंडळांच्या पलीकडे एक शक्ती आहे जी सादर करावी लागेल आणि काही हक्क आहेत ज्यांचा आदर केला पाहिजे.

या अनुच्छेदाद्वारे आम्ही आमच्या सर्वोच्च न्यायव्यवस्थेला एक शक्ती, एक दर्जा आणि एक प्रतिष्ठा देतो जी त्यांच्याकडून सचोटी आणि सरळपणाचे सर्वोच्च गुण सांगेल. या अनुच्छेदाचा संपूर्ण अर्थ लक्षात घेतला पाहिजे जेव्हा आपण अनुच्छेद १०३ पासून सुरू होणाऱ्या राज्यघटनेच्या त्या भागाकडे येतो, जेव्हा आपल्याला या भूमीत एक प्रामाणिक आणि पूर्णपणे न्यायव्यवस्था स्थापित करण्याच्या चरणांची छाननी करावी लागेल . जेव्हा आपण त्या भागाचा विचार करू, तेव्हा आपण या अधिकारांची आठवण करून देऊ या आणि या सर्व विविध तरतुदी न्याय्य आणि निर्भयपणे लागू केल्या जातील याची खात्री करूया."

२०. या पार्श्वभूमीवर भारतीय राज्यघटनेचे कलम ३२ अंमलात आणले गेले आहे, हे सुनिश्चित करण्यासाठी की सर्वोच्च न्यायालय नेहमीच राज्याच्या इतर अवयवांना सामोरे जाण्यासाठी सज्ज आहे, विशेषत: अशा परिस्थितीत, ज्यात नागरी आणि वैयक्तिक स्वातंत्र्याची हमी मूलभूत अधिकाऱ्याद्वारे दिलेली आहे, धोक्यात असतील.

२१. तसेच आमच्या असे निदर्शनास आले आहे की, **<u>अतिरिक्त सीमाशुल्क</u>**

<u>**आयुक्त वि. राम निवास वर्मा**</u>[1]<u>**, सीमाशुल्क आयुक्त वि. अविनाश डावर आणि दुसरा**</u>[2] <u>**आणि**</u> <u>**सीमाशुल्क आयुक्त विरुद्ध ज्योत्सना चिकेरसाल आणि दुसरा**</u> [3] या प्रकरणांमध्ये, दिल्ली उच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विरुद्ध भूमिका घेतली आहे. माझ्या नम्र मते, या न्यायालयाने या विषयावर अधिकृत निर्णय न दिल्यामुळे कायद्यातील अशी संदिग्धता निर्माण झाली आहे. कायद्यातील या निश्चिततेचा अभाव, वेगवेगळ्या अधिकारक्षेत्रात समानस्थीत असलेल्या व्यक्तींच्या भिन्न परिणामांना कारणीभूत ठरला आहे.

२२. अशा परिस्थितीत, जेथे समान परिस्थिती असलेल्या व्यक्ती भिन्न परिणामांना बळी पडत आहेत, या न्यायालयाने दोन न्यायनिर्णयांच्या संचामधील विरोधाभासाचे निराकरण करून अशा संदिग्धतेचे स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे, याची खात्री करण्यासाठी की विरोधाभासी मतांमुळे झालेला खोडसाळपणा मिटविण्यात आला आहे आणि कायद्यातील निश्चितता पुनर्संचयित करण्यात आली आहे .

२३. उपरोक्त चर्चांवर आधारित, केवळ तांत्रिकतेच्या आधारे याचिका कायम ठेवण्याबाबत, उत्तरवादीने उपस्थित केलेल्या प्राथमिक आक्षेपांशी आम्ही सहमत नाही

---

1 २०१५ एससीसी ऑनलाईन डी इ एल ११५४२

2 २०१५ एससीसी ऑनलाईन डी इ एल १३८७५

3 २०१९ एससीसी ऑनलाईन डी इ एल ६५७४

आणि त्यानुसार आम्ही ते नाकारतो.

<u>उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयांच्या दोन संचांमधील विरोधाभास</u>

२४. गुणवत्तेवर युक्तिवाद करताना, याचिकाकर्त्याच्या वतीने उपस्थित असलेल्या विद्वान वकिलांनी **युनियन ऑफ इंडिया विरुद्ध सुरेश रहेजा आणि इतर**[4] या प्रकरणातील न्यायनिर्णयावर भार ठेवला. उपरोक्त प्रकरणातील याचिकाकर्ता ग्रीन चॅनेल प्रवेशद्वारातून मालाची तस्करी करण्याचा प्रयत्न करताना पकडला गेला. प्रस्तुतच्या प्रकरणाप्रमाणेच त्यातील तस्करी वस्तूंची जप्ती सीमाशुल्क क्षेत्रामध्ये आयोजित करण्यात आली होती. जप्तीनंतर, त्यात याचिकाकर्ता थकबाकीची पुर्तता करण्यास आणि सीमाशुल्क कायद्याच्या कलम १२७ अंतर्गत दिलासा मिळविण्यास सक्षम होता. तथापि, जप्त केलेल्या वस्तूंचा सीमाशुल्क कायद्याच्या कलम १२३ मध्ये स्पष्टपणे उल्लेख केला होता , ज्यामुळे सदर कायद्याच्या कलम १२७ बी अंतर्गत प्रकरणे निकाली काढण्यास प्रतिबंध होतो. सदर न्यायनिर्णयाचा संबंधित परिच्छेद खाली उद्धृत करण्यात आला आहे :-

> “ हे लक्षात घेणे आवश्यक आहे की आतापर्यंत वस्तूंच्या उत्पत्तीचा विचार करता, दागिने आणि घड्याळे या दोन्ही बाबतीत कोणताही वाद नाही. त्यामुळे, याचिकाकर्त्याचा दावा चुकीचा आहे की, उत्तरवादी उपरोक्त कायद्याच्या कलम

---

4 २०११ (२६७) इ . एल. टी ४८७ (बिओएम)

१२३ द्वारे टाकलेले ओझे सोडण्यात अयशस्वी ठरले आहेत . एकदा मालाची उत्पत्ती वादात न आल्यास, सेटलमेंट कमिशनने म्हटल्याप्रमाणे उत्तरवादी यांना सेटलमेंट कमिशनच्या अधिकार क्षेत्राचा आग्रह धरण्याचा अधिकार होता आणि म्हणून, कलम १२७ बी च्या परंतुकामध्ये समाविष्ट असलेले प्रतिबंध त्यांच्या मार्गात येऊ शकले नसते. सेटलमेंट कमिशनचे निष्कर्ष: उपरोक्त वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर की उत्तरवादी जे सेटलमेंट कमिशनसमोर अर्जदार होते, त्यांनी उपरोक्त कायद्याच्या कलम १२७(बी) (१) मध्ये घालून दिलेल्या सर्व अटी पूर्ण केल्या त्याला सदर वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर संभाव्य दृश्य असे म्हणता येईल."

२५. या मुद्द्यावर निर्णय देताना, मुंबई उच्च न्यायालयाने असे सांगितले की जर एखाद्या आरोपीला सीमाशुल्क क्षेत्रात पकडले गेले तर, त्याच कायद्याच्या कलम १२३ अंतर्गत नमूद केलेल्या वस्तूंवरील सीमा शुल्क कायद्याच्या कलम १२७ वरील प्रतिबंध निरर्थक आहे आणि आरोपीला सेटलमेंटच्या उपायाचा हक्क आहे.

२६. उत्तरवादीच्या वतीने उपस्थित असलेले विद्वान वकील, यांनी **<u>अतिरिक्त सीमाशुल्क आयोग विरुद्ध अशोक कुमार</u>**[5] या प्रकरणातील न्यायनिर्णयावर भिस्त ठेवली. याचिकाकर्त्याचा सेटलमेंट अर्ज कायम ठेवण्यायोग्य असल्याचे मानले जात होते, तथापि, उपरोक्त न्यायनिर्णयाच्या परिच्छेद १० मध्ये, न्यायालयाने एक ओझरता संदर्भ दिला होता की याचिकाकर्त्याच्या व्यक्तीकडे सापडलेल्या वस्तूंचा सीमाशुल्क कायद्याच्या कलम

5 २०१६ (३३६) इ . एल. टी २२४ (डी इ एल)

१२३ अंतर्गत उल्लेख आढळल्या नसल्यामुळे त्याच कायद्याच्या कलम १२७ द्वारे त्या प्रतिबंधित केल्या गेल्या नव्हत्या. वर नमूद केलेल्या न्यायनिर्णयाचा संबंधित परिच्छेद येथे पुन्हा सादर केला जात आहे:-

> "हे वादातीत नाही की सध्याचे प्रकरण कायद्याच्या कलम १२७ बी(१) च्या कोणत्याही तरतुदींमध्ये समाविष्ट नाही . दुसऱ्या शब्दांत, ते प्रकरणांच्या कोणत्याही वगळलेल्या श्रेणींमध्ये येत नाही. या टप्प्यावर हे लक्षात घेतले जाऊ शकते की सीमाशुल्क अतिरिक्त आयुक्त विरुद्ध श्री राम निवास वर्मा (उपरोलेखित) प्रकरणामधील निर्णय हा एक खटला होता ज्यामध्ये आयात केलेल्या वस्तू कलम १२७ बी (१) च्या तिसऱ्या तरतुदी अंतर्गत समाविष्ट केल्या गेल्या होत्या आणि म्हणून हा निर्णय तथ्यांवर वेगळा आहे ."

२७.संदिग्धतेचे हे मळभ दूर करण्यासाठी आणि उच्च न्यायालयाच्या या दोन न्यायनिर्णयांमधील विरोधाभासाचे निराकरण करण्यासाठी, आपण प्रथम सीमाशुल्क कायद्याच्या कलम १२३ आणि कलम १२७ बी चे विश्लेषण केले पाहिजे. सोयीसाठी, संबंधित कलमे येथे पुन्हा सादर केली जात आहेत:-

"१२३. काही प्रकरणांमध्ये पुराव्याचे ओझे(जबाबदारी).

(१) ज्या वस्तूंना हे कलम लागू होते अशा कोणत्याही वस्तू या कायद्यांतर्गत त्या तस्करीचा माल असल्याच्या वाजवी विश्वासाने जप्त केल्या

गेल्या असतील, तर त्या तस्करीच्या वस्तू नाहीत हे सिद्ध करण्याचे ओझे असेल-

(अ) कोणत्याही व्यक्तीच्या ताब्यातून अशी जप्ती केली जाते अशा प्रकरणात,

(१) ज्या व्यक्तीच्या ताब्यातून माल जप्त करण्यात आला आहे; आणि

1. (२) ज्याच्या ताब्यातून माल जप्त करण्यात आला, त्या व्यक्तीशिवाय अन्य कोणतीही व्यक्ती त्याचा मालक असल्याचा दावा करत असेल, तर अशा अन्य व्यक्तीवरही;

(ब) इतर कोणत्याही प्रकरणात, अशा प्रकारे जप्त केलेल्या मालाचा मालक असल्याचा दावा करणाऱ्या व्यक्तीवर, जर असल्यास.]

(२) हे कलम सोने २ [आणि त्यातील उत्पादक] घड्याळे आणि केंद्र सरकार अधिकृत राजपत्रात अधिसूचनेद्वारे निर्दिष्ट करू शकेल अशा इतर कोणत्याही प्रकारच्या वस्तूंना लागू होईल.

1. <u>१२७ ब प्रकरणे समझोत्याद्वारे निकाली काढण्यासाठी अर्ज.</u>

(१) कोणताही आयातदार, निर्यातदार किंवा इतर कोणतीही व्यक्ती (यापुढे या

प्रकरणात अर्जदार म्हणून संदर्भित) त्याच्याशी संबंधित प्रकरणाच्या संदर्भात, अभिनिर्णयापूर्वी, प्रकरण समझोत्याद्वारे निकाली काढण्यासाठी, जमाबंदी आयोगाकडे नियमांत निर्दिष्ट करण्यात येईल अशा स्वरूपात आणि अशा पद्धतीने अर्ज करू शकेल आणि त्यामध्ये त्याच्या शुल्काच्या दायित्वाचा, योग्य अधिकाऱ्यासमोर उघड न केलेला, पूर्ण आणि खरा खुलासा, असे दायित्व ज्या पद्धतीने केले आहे ती पद्धत, त्याच्याकडून देय असलेल्या सीमा शुल्काची अतिरिक्त रक्कम आणि ज्यासंदर्भात तो चुकीचे वर्गीकरण, अधोमूल्यन किंवा सूट दिल्याची अधिसूचना [254] [किंवा अन्यथा] लागू नसल्यामुळे कमी कर आकारल्याची कबुली देतो , अशा शुल्कयोग्य वस्तूंच्या तपशीलांसह, नियमांद्वारे निर्दिष्ट केल्याप्रमाणे इतर तपशील समाविष्ट असतील आणि असा अर्ज खाली तरतूद केलेल्या पद्धतीने निकाली काढण्यात येईल *:* परंतु असे की,

(अ) अर्जदाराने अशा वस्तूंच्या आयात किंवा यथास्थिती निर्यातीसंदर्भात माल नोंदपत्र किंवा शिपिंग बिल दाखल केले आहे आणि अशा माल नोंदपत्र किंवा शिपिंग बिलाच्या संदर्भात योग्य अधिकाऱ्याने त्याला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे *;*

(ब) अर्जदाराने आपल्या अर्जात स्वीकारलेल्या शुल्काची अतिरिक्त रक्कम तीन लाख रुपयांपेक्षा जास्त आहे *;* आणि

(क) अर्जदाराने कलम २८ एबी अंतर्गत देय व्याजासह त्याने स्वीकारलेल्या सीमा शुल्काची अतिरिक्त रक्कम भरली आहे :

तर असा कोणताही अर्ज केला जाणार नाही.

परंतु पुढे असे की, अपीलीय न्यायाधिकरणात किंवा कोणत्याही न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांमध्ये, या पोट- कलमांतर्गत जमाबंदी आयोगाकडून कोणताही अर्ज ग्राह्य धरला जाणार नाही : परंतु असेही की, कलम १२३ लागू असलेल्या वस्तूंसंदर्भात किंवा अंमली औषधिद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ अधिनियम, १९८५ (सन १९८५ चा अधिनियम क्र. ६१) अंतर्गत कोणताही गुन्हा केलेल्या वस्तूंसंदर्भात, या पोट-कलमान्वये कोणताही अर्ज केला जाणार नाही : परंतु असेही की, सीमाशुल्क अधिनियम, १९७५ (सन १९७५ चा अधिनियम क्र. ५१) अंतर्गत वस्तूंच्या वर्गीकरणाच्या स्पष्टीकरणासाठी या पोट-कलमान्वये कोणताही अर्ज केला जाणार नाही.

(१ अ) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, पोट- कलम (१) अन्वये दिनांक १ जून २००७ पूर्वी जरी अर्ज केलेला असला, परंतु, कलम १२७ क च्या पोट- कलम (१) अन्वये कोणताही आदेश सदर तारखेपूर्वी देण्यात आला नसला तरी, अर्जदार दिनांक १ जून २००७ पासून तीस दिवसांच्या कालावधीत स्वीकृत शुल्क दायित्व भरेल आणि त्यात कसूर

केल्यास त्याचा अर्ज फेटाळण्यात येईल.

२८. सीमाशुल्क अधिनियम, १९६२ च्या कलम १२३ मध्ये नमूद करण्यात आले आहे की, मालाची तस्करी करताना जर एखाद्या आरोपीला प्राधिकाऱ्यांनी पकडले, तर शाबीतीचा भार, जो मुळात अभियोग पक्षाकडे असतो, तो उलटला जातो आणि तो अभियोग पक्षाकडून बचाव पक्षाकडे जातो. सोप्या भाषेत याचा अर्थ असा होईल की, अशा प्रकरणांमध्ये अभियोग पक्षाने आरोपी व्यक्तीचा गुन्हा सिद्ध करण्याऐवजी, आरोपीलाच आपले निर्दोषत्व सिद्ध करण्याचे काम दिले जाते.

२९. आमच्या मते, ज्या प्रकरणांत आरोपी निर्दोष असण्याची वाजवी शक्यता असते, त्या प्रकरणांतच शाबीतीच्या भारातून मुक्त होण्याची बाब घडते. प्रस्तुत प्रकरणात यातील याचिकाकर्त्याला सीमाशुल्क क्षेत्रात आक्षेपित वस्तूंसह पकडण्यात आले होते. अशा परिस्थितीत, जेव्हा आक्षेपित माल आरोपीच्या अंगावर आणि सीमाशुल्क क्षेत्रात आढळतो, तेव्हा आरोपी निर्दोष असण्याची शक्यता अशक्य असते, कारण बेकायदेशीर कृत्य गुन्ह्याच्या गर्तेत अडकलेले असते.

३०. सीमाशुल्क क्षेत्रातील जप्तीच्या प्रकरणांमध्ये, शाबीतीच्या भारातून मुक्तता किंबहुना शाबीतीच्या भाराचा प्रश्नच निरर्थक ठरत असल्यामुळे, अशा कार्याची सक्ती करणारी तरतूदही आपोआपच निरर्थक ठरते. वर नमूद केलेल्या चर्चेच्या अनुषंगाने, सीमाशुल्क क्षेत्रातील जप्तीच्या प्रकरणांमध्ये सीमाशुल्क अधिनियमाचे कलम १२३

लागू होऊ शकत नाही आणि म्हणूनच **<u>सुरेश न्यायनिर्णय (उपरोल्लेखित)</u>** यात मुंबई उच्च न्यायालयाने पारित केलेल्या न्यायनिर्णयात कायद्याची योग्य स्थिती नमूद करण्यात आली आहे. ही बाब सुद्धा लक्षात घेतली पाहिजे की, मुंबई उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयास याआधीही या न्यायालयासमोर अपिलात आक्षेप घेण्यात आला होता आणि दिनांक १४.०९.२०११ रोजीच्या आदेशान्वये या न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या निर्णयाशी सहमती दर्शविली होती आणि महसूल विभागाचे अपील फेटाळले होते. या प्रकरणातील तथ्ये व परिस्थिती वर नमूद केलेल्या प्रकरणाशी मिळतीजुळती असल्यामुळे, येथे वेगळा दृष्टिकोन बाळगण्याचे कोणतेही ठोस कारण आम्हाला आढळत नाही.

३१. वरील तथ्यांच्या व चर्चेच्या पार्श्वभूमीवर, आमचे मत असे आहे की, मुंबई उच्च न्यायालयाने **<u>सुरेश न्यायनिर्णयात (उपरोल्लेखित)</u>** दिलेला न्यायनिर्णय कायद्याच्या सुधारणेची स्थिती स्पष्ट करतो आणि आम्ही त्यास सहमती व मान्यता देतो.

३२. उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयांच्या दोन संचांमधील विरोधाभास संपुष्टात आला असला, तरी सदर अर्थउकलीमधून येणारे इतर काही मुद्देसुद्धा, आमच्या मते स्पष्ट झाले पाहिजेत.

३३. उत्तरवादीच्या विद्वान वकिलाने आपल्या निवेदनाद्वारे असा युक्तिवाद केला

की, सीमाशुल्क अधिनियमाच्या कलम ७७ अन्वये अनिवार्य असल्याप्रमाणे, वस्तू घोषित न करणे हे जमाबंदी आयोगाची अधिकारिता काढून टाकते. हा युक्तिवाद स्पष्ट करण्यासाठी सर्वप्रथम, येणाऱ्या प्रवाशांच्या परवानगी (क्लिअरन्स) साठीच्या मार्गिकांचा विचार केला पाहिजे, त्या म्हणजे प्रवेशाची लाल मार्गिका आणि प्रवेशाची हरित मार्गिका.

३४. जेव्हा येणारा प्रवासी सीमा शुल्क पडताळणीतून जातो, तेव्हा त्याच्याकडे परवानगीचे दोन पर्याय आहेत, ते म्हणजे प्रवेशाची लाल मार्गिका आणि प्रवेशाची हरित मार्गिका. जेव्हा येणाऱ्या प्रवासी प्रवेशाच्या लाल मार्गिकेने जातो, तेव्हा प्रवाशाने हे मान्य केलेले असते की, त्यांच्याकडे शुल्कास पात्र असलेल्या वस्तू आहेत आणि म्हणूनच, त्यांच्या स्वत: च्या कबुलीनुसार, सीमा शुल्क अधिनियमाच्या कलम ७७ नुसार शुल्क लागू असलेल्या वस्तू घोषित करणे बंधनकारक आहे.

३५. जर एखाद्या प्रवाशाने प्रवेशाच्या हरित मार्गिकेचा पर्याय निवडला, तर याचा अर्थ असा होतो की प्रवाशी, प्रवेशाच्या लाल मार्गिकेचा पर्याय न निवडून, आपल्याकडे शुल्कास पात्र असलेल्या कोणत्याही वस्तू नसल्याचे सांगत आहे आणि म्हणूनच, असे मानले जाते की, ते सीमा शुल्क अधिनियमाच्या कलम ७७ अन्वये "निरंक" शुल्क योग्य वस्तू नेण्याचे घोषित करीत आहेत.

३६. परंतु, जर एखाद्या प्रवाशाने प्रवेशाच्या हरित मार्गिकेचा पर्याय निवडण्याचे

ठरविले, परंतु, तरीही तो जर शुल्क आकारणीच्या अधीन असलेल्या वस्तूंसह आढळला, तर ते सीमा शुल्क अधिनियमानुसार जप्तीस आणि दंडात्मक कारवाईस पात्र ठरतात. सीमाशुल्क अधिनियमातील दंडात्मक तरतुदींस पात्र ठरल्यामुळे, आपोआपच असे सुद्धा ध्वनित झाले पाहिजे की, त्यांना त्याच अधिनियमानुसार समझोत्याचा लाभ दिला जातो. अशा परिस्थितीत कोणतीही तडजोड करता येत नाही, ज्यामध्ये आरोपीच्या कृत्याकरिता दंडात्मक परिणामांसाठी जबाबदार धरले जाते, परंतु, त्याच अधिनियमांतर्गत असलेल्या उपायांचा लाभ नाकारला जातो.

३७. शिवाय, जर आपण सीमाशुल्क अधिनियमाच्या कलम ७७ अन्वये घोषित न करण्यामुळे, येणाऱ्या प्रवाशाला समझोत्याचा लाभ घेण्यापासून आपोआप रोखता येईल, हे विधान जर आपण मान्य केले, तर प्रवेशाची हरित मार्गिका म्हणजे अधिनियमाच्या कलम ७७ अन्वये "निरंक" मालाची घोषणा करणे, या आमच्या निरीक्षणाच्या पार्श्वभूमीवर, समझोत्याची तरतूद अप्रासंगिक आणि निष्प्रभ ठरेल, कारण कोणत्याही आरोपीला कधीही समझोत्याचा लाभ घेता येणार नाही.

३८. म्हणून, वरील चर्चेच्या अनुषंगाने, अशी व्यक्ती समझोत्याचा वैधानिक उपाय का निवडू शकत नाही, याचे कोणतेही कारण आम्हांला दिसून येत नाही आणि म्हणूनच या संदर्भातील उत्तरवादींचा आक्षेप आम्ही फेटाळून लावतो.

३९. त्यानंतर आपण शेवटच्या मुद्द्यावर येतो, जो आम्ही विचारात घेणे

आवश्यक आहे. उत्तरवादीच्या वतीने उपस्थित विद्वान वकिलांनी असा युक्तिवाद केला की, अन्य व्यक्तीच्या सांगण्यावरून आक्षेपित वस्तू आयात करणारी कोणतीही व्यक्ती तस्कर आहे आणि त्यामुळे अशा प्रकरणांमध्ये जमाबंदी आयोगाकडे जाता येऊ शकत नाही.

४०. उत्तरवादींच्या वतीने उपस्थित विद्वान वकिलांनी केलेला हा युक्तिवाद आमच्या मते कायद्याच्या दृष्टीनेही चुकीचा आहे. **टाटा टेलिसर्व्हिसेस (महाराष्ट्र) लि. वि. केंद्र सरकार २००६**[6] या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने अशाच एका मुद्द्यावर निर्णय देताना **लीलावती बाई वि. म्हैसूर राज्य** या प्रकरणातील या न्यायालयाच्या घटनापीठाच्या न्यायनिर्णयावर विसंबून [7]अधिनियमाच्या कलम १२७ ब मध्ये नमूद केल्याप्रमाणे "किंवा अन्यथा" या शब्दप्रयोगास एक विस्तृत अर्थ दिला आणि असा निर्णय दिला की, जमाबंदी आयोगाच्या अधिकारक्षेत्राचा वापर तस्करी, लबाडी किंवा जाणूनबुजून चुकीची घोषणा करणाऱ्या व्यक्तीद्वारे केला जाऊ शकतो. मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयातील संबंधित परिच्छेद येथे पुनः उद्धृत करण्यात येत आहे :-

> "४६. .... याउलट सीमाशुल्क अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराला कारणे दाखवा नोटीस बजावल्यानंतरच अर्जदार अर्ज दाखल करू शकतो, जी कारणे दाखवा नोटीस, आम्ही वर नमूद केल्याप्रमाणे जप्तीशीसुद्धा

6 (२०१) इएलटी ५२९ (बॉम्बे)

7 एआयआर १९५७ एससी ५२१

संबंधित असेल, म्हणजे ज्या व्यक्तीने लबाडी किंवा तस्करी केली आहे किंवा जाणूनबुजून चुकीची माहिती दिली आहे, त्यालाच केवळ अशी कारणे दाखवा नोटीस मिळेल आणि अर्ज करण्यापूर्वी अशी कारणे दाखवा नोटीस देणे हा आवश्यक घटक आहे.. ....”

४१. शिवाय, मुंबई उच्च न्यायालयाचा वरील न्यायनिर्णयावर सर्वोच्च न्यायालयात अपीलाच्या माध्यमातून आक्षेप घेण्यात आला आणि दिनांक ०३.०८.२०११ रोजीच्या आदेशाद्वारे या न्यायालयाने तो फेटाळून लावत उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयास कायम केले.

४२. वर नमूद केलेल्या चर्चेच्या आधारे, आमचे मत असे आहे की, या संदर्भात देखील उत्तरवादीचा युक्तिवाद फेटाळण्यास पात्र आहे.

निष्कर्ष

४३. याचिकाकर्त्याने केलेल्या अतिरिक्त युक्तिवादाद्वारे, आमच्या असे निदर्शनास आणण्यात आले आहे की, सीमा शुल्क आयुक्तांनी याचिकाकर्त्याला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. कारणे दाखवा नोटीस आधीच बजावण्यात आली असल्यामुळे त्यासंदर्भात कोणत्याही निर्देशांची आवश्यकता नाही. जर याचिकाकर्त्याने समझोत्याचा अर्ज दाखल केला असेल, तर जमाबंदी आयोगाकडून, तो त्यातील गुणवत्तेनुसार आणि कायद्यानुसार आणि सीमा शुल्क अधिनियमाच्या कलम १२७ एच

अंतर्गत विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार हाताळण्यात येईल. परंतु, आम्हांला असे निरीक्षण नोंदविणे योग्य वाटते की, जमाबंदी आयोगास योग्य वाटल्यास, समझोत्याच्या या एक वेळच्या संधीसाठी, कारणे दाखवा नोटीस बजावल्यानंतरसुद्धा, जमाबंदी आयोगामध्ये नियुक्त केलेल्या "आयोगा (अन्वेषण)" कडून तो (आयोग) पुढील अहवाल मागवू शकतो.

४४. प्रकरणाच्या गुणवत्तेबाबत कोणतेही निरीक्षण नोंदविणे आम्ही टाळतो आणि ही बाब जमाबंदी आयोगाच्या विचारार्थ सोडतो.

४५. त्यानुसार रिट याचिकेसह त्यातील अर्जासह अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

संजय करोल, न्या.

१. माझे आदरणीय बंधू माननीय न्यायमूर्ती कृष्ण मुरारी यांनी मांडलेल्या व्यासंगपूर्ण मताचे मी अवलोकन केले आहे. आदरपूर्वक, मी स्वतः सहमत होण्यास असमर्थ आहे ; म्हणून, मी स्वतंत्रपणे माझे निष्कर्ष लिहितो.

२. आमच्यासमोर दोन मुद्दे विचारार्थ उद्भवतात ; एक म्हणजे सीमाशुल्क अधिनियमाच्या कलम १२३ अन्वये निर्दिष्ट केलेल्या जप्त मालासाठी सीमाशुल्क अधिनियम, १९६२ च्या कलम १२७ ब अन्वये समझोत्याचा उपाय उपलब्ध होईल का? दुसरा म्हणजे, उपस्थित तथ्यांमध्ये, भारताच्या राज्यघटनेच्या अनुच्छेद ३२ अन्वये

मिळालेल्या अधिकारांचा वापर करणे योग्य ठरेल का ?

सीमाशुल्क अधिनियमाचे स्वरूप, व्याप्ती, उद्देश व योजना

३. सागरी सीमाशुल्क, जमीन सीमा शुल्क आणि हवाई सीमाशुल्क यासंदर्भातील तरतुदींचे एकत्रीकरण करण्यासाठी एक सर्वसमावेशक उपाययोजना म्हणून सीमाशुल्क अधिनियम, १९६२ (यापुढे अधिनियम असे संबोधण्यात आले आहे) लागू करण्यात आला. तस्करीच्या मालावर कठोर आणि जलदगतीने कारवाई करणे आणि अशा तऱ्हेने महसुलात होणारी घट रोखणे यांकरिता हा अधिनियम आहे. या अधिनियमानुसार लादलेल्या निर्बंधांच्या विरोधात कोणतीही वस्तू आयात केल्यास माल जप्त करण्याची आणि दंड आकारण्याची तरतूद अधिनियमात करण्यात आली आहे [**सीमा शुल्क आयुक्त वि. एम. अंबालाल, (२०११) २ एससीसी ७४** (२ न्यायाधीशांचे खंडपीठ)].

४. या कायद्यामागचा वैधानिक हेतू समजून घेण्यासाठी त्यातील योजनेवर चर्चा करणे महत्वाचे आहे.

५. या अधिनियमाच्या प्रकरण दोनमध्ये सीमाशुल्क अधिकाऱ्यांची नेमणूक आणि या अधिनियमांतर्गत त्यांचे अधिकार यांचा समावेश आहे.

६. प्रकरण ३ मध्ये सीमाशुल्क बंदरे आणि विमानतळांची नेमणूक नमूद केली आहे, जेथे आयात केलेला माल उतरवला जाईल आणि निर्यातीचा माल भरला जाईल आणि त्यास परवानगी दिली जाईल.

७. चौथ्या प्रकरणात भारताची सुरक्षा राखणे आणि तस्करी रोखणे यांसारख्या त्यात नमूद केलेल्या हेतूंसाठी वस्तूंच्या आयातीवर किंवा निर्यातीवर बंदी घालण्याचा अधिकार केंद्र सरकारला देण्यात आला आहे.

८. प्रक्रण ४अ मध्ये बेकायदेशीररीत्या आयात केलेल्या वस्तूंचा शोध घेणे आणि त्यांची विल्हेवाट रोखण्याची तरतूद आहे.

९. प्रकरण पाच मध्ये सीमाशुल्क लादणे आणि त्यापासून सूट देण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

१०. प्रकरण सात हे आयात आणि निर्यात केलेल्या वस्तूंच्या मंजुरीशी संबंधित आहे. हे प्रकरण मालासाठी परवानगी न मिळाल्यास करण्यात येणाऱ्या कार्यपद्धतीशी सुद्धा संबंधित आहे.

११. प्रकरण अकरा मध्ये सामान, आयात किंवा निर्यात केलेल्या वस्तूंबाबत विशेष तरतुदी आणि आवश्यक घोषणा स्पष्ट करण्यात आली आहे. या प्रकरणात, कलम ८३ मध्ये आयात किंवा निर्यात केलेल्या वस्तूंवर शुल्क दर आणि प्रशुल्क लावण्याची परवानगी देण्यात आली आहे.

१२. प्रकरण तेरा मध्ये शोध, जप्ती आणि अटकेशी संबंधित अधिकारांची तरतूद करण्यात आली आहे. या प्रकरणात, एखादया व्यक्तीने खोटे घोषित केले (कलम १३२), सीमाशुल्क अधिकाऱ्यास अडथळा आणला (कलम १३३) किंवा देय असलेले

सीमा शुल्क चुकवले (कलम १३५), असे जर सीमाशुल्क अधिकाऱ्याला मानण्यासाठी कारण असेल, तर त्याला कलम १०५ अन्वये अशा व्यक्तीला अटक करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. तसेच कलम १०८ ब नुसार योग्य अधिकाऱ्याच्या निर्देशानुसार माहिती सादर करण्यात कसूर केल्यास दंड ठोठावला जातो.

१३. प्रकरण १४ मध्ये माल जप्त करण्याची आणि दंड आकारण्याची परवानगी देण्यात आली आहे. त्याअंतर्गत कलम १११ व ११२ मध्ये जप्तीस पात्र असलेल्या मालाची यादी व त्यावरील दंड नमूद करण्यात आला आहे. कलम १२३ मधील तरतुदीमुळे काही विनिर्दिष्ट जप्त मालाच्या शाबीतीचा भार उलटतो.

१४. प्रकरण चौदामध्ये प्रकरणांमध्ये समझोत्याद्वारे निकाली काढण्याबाबत पद्धत समाविष्ट आहे.

१५. अधिनियमाच्या प्रकरण १६ मध्ये, सीमाशुल्क अधिनियमांतर्गत गुन्हे आणि खटला चालविण्याची तरतूद आहे. या प्रकरणात, काही गुन्ह्यांसाठी दंड म्हणून तुरुंगवासाची तरतूद करण्यात आली आहे. ते म्हणजे : सीमाशुल्कासंदर्भात खोटे घोषित करणे (कलम १३२ ; १ वर्षापर्यंत वाढू शकतो), सीमा शुल्क अधिकाऱ्यास अडथळा (कलम १३३ ; १ वर्षापर्यंत वाढू शकतो), क्ष -किरण (तपासणी) करण्यास नकार देणे (कलम १३४ ; ६ महिन्यांपर्यंत वाढू शकतो) आणि करचुकवेगिरी किंवा प्रतिबंध (कलम १३५; सात वर्षांपर्यंत वाढू शकतो).

१६. वरील बाबी लक्षात घेता, हे स्पष्ट होते की, अधिनियमाच्या योजनेमध्ये, कारावासासह, विविध दंडात्मक परिणामांच्या स्वरूपात सीमाशुल्क लादणे, माल जप्त करणे आणि टाळण्याचे किंवा टाळण्याचा प्रयत्न करण्याचे परिणाम समाविष्ट आहेत. **अंबालाल** (उपरोल्लेखित) या प्रकरणात या न्यायालयाने नमूद केल्याप्रमाणे या अधिनियमाचा हेतू आहे, तो म्हणजे कायद्यातील निर्बंधांचे उल्लंघन करून भारतात तस्करी केलेल्या वस्तूंवर कठोरपणे आणि जलदगतीने कारवाई करणे.

१७. वरीलप्रमाणे अधिनियमाचा हेतू लक्षात घेता, मी आता या वादाशी संबंधित कलमांची चर्चा करतो : अधिनियमाचे १२३ आणि कलम १२७ ब.

१८. अधिनियमाच्या कलम १२३ मध्ये विशिष्ट प्रकरणांमध्ये शाबीतीच्या भाराबाबत नमूद करण्यात आले आले आहे. त्यात खालीलप्रमाणे लिहिले आहे:

"१२३. विशिष्ट प्रकरणांमध्ये शाबीतीची जबाबदारी. -

(१) ज्या मालाला हे कलम लागू होते, तो तस्करीचा माल आहे या वाजवी विश्वासाने जर तो या अधिनियमान्वये जप्त केला गेला, तर तो तस्करीचा माल नाही हे शाबीत करण्याचा भार -

(अ) कोणत्याही व्यक्तीच्या ताब्यातून अशी जप्ती केल्यास, -

(१) ज्याच्या ताब्यातून माल जप्त करण्यात आला, त्या व्यक्तीवर ; आणि (२) ज्याच्या ताब्यातून माल जप्त करण्यात आला, त्या व्यक्तीशिवाय अन्य

कोणतीही व्यक्ती त्याचा मालक असल्याचा दावा करत असेल, तर अशा अन्य व्यक्तीवरही;

(ब) इतर कोणत्याही प्रकरणात, अशा प्रकारे जप्त केलेल्या मालाचा मालक असल्याचा दावा करणाऱ्या व्यक्तीवर असेल.

<u>(२) हे कलम सोने २ [आणि त्यातील उत्पादक] घड्याळे आणि केंद्र सरकार अधिकृत राजपत्रात अधिसूचनेद्वारे निर्दिष्ट करू शकेल अशा इतर कोणत्याही प्रकारच्या वस्तूंना लागू होईल.</u>"

१९. या अधिनियमाचे कलम १२७ ब हे एखाद्या व्यक्तीने अभिनिर्णयासाठी प्रलंबित प्रकरणाच्या संदर्भात प्रकरणाच्या समझोत्याद्वारे निकाली काढण्यासाठी केलेल्या अर्जाच्या कार्यपद्धतीशी संबंधित आहे. महत्त्वाचे म्हणजे, सदर कलमाच्या परंतुकात असे नमूद करण्यात आले आहे की, ज्या वस्तूंना कलम १२३ लागू होते, त्या वस्तूंबाबत कोणताही अर्ज करता येणार नाही. त्यात खालीलप्रमाणे लिहिले आहे:

"<u>१२७ ब प्रकरणे समझोत्याद्वारे निकाली काढण्यासाठी अर्ज.</u>

(१) कोणताही आयातदार, निर्यातदार किंवा इतर कोणतीही व्यक्ती (यापुढे या प्रकरणात अर्जदार म्हणून संदर्भित) त्याच्याशी संबंधित प्रकरणाच्या संदर्भात, अभिनिर्णयापूर्वी, प्रकरण समझोत्याद्वारे निकाली काढण्यासाठी, जमाबंदी आयोगाकडे नियमांत निर्दिष्ट करण्यात येईल अशा स्वरूपात आणि अशा

पद्धतीने अर्ज करू शकेल आणि त्यामध्ये त्याच्या शुल्काच्या दायित्वाचा, योग्य अधिकाऱ्यासमोर उघड न केलेला, पूर्ण आणि खरा खुलासा, असे दायित्व ज्या पद्धतीने केले आहे ती पद्धत, त्याच्याकडून देय असलेल्या सीमा शुल्काची अतिरिक्त रक्कम आणि ज्यासंदर्भात तो चुकीचे वर्गीकरण, अधोमूल्यन किंवा सूट दिल्याची अधिसूचना [254] [किंवा अन्यथा] लागू नसल्यामुळे कमी कर आकारल्याची कबुली देतो , अशा शुल्कयोग्य वस्तूंच्या तपशीलांसह, नियमांद्वारे निर्दिष्ट केल्याप्रमाणे इतर तपशील समाविष्ट असतील आणि असा अर्ज खाली तरतूद केलेल्या पद्धतीने निकाली काढण्यात येईल : परंतु असे की,

(अ) अर्जदाराने अशा वस्तूंच्या आयात किंवा यथास्थिती निर्यातीसंदर्भात माल नोंदपत्र किंवा शिपिंग बिल दाखल केले आहे आणि अशा माल नोंदपत्र किंवा शिपिंग बिलाच्या संदर्भात योग्य अधिकाऱ्याने त्याला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे ;

(ब) अर्जदाराने आपल्या अर्जात स्वीकारलेल्या शुल्काची अतिरिक्त रक्कम तीन लाख रुपयांपेक्षा जास्त आहे ; आणि

(क) अर्जदाराने कलम २८ एबी अंतर्गत देय व्याजासह त्याने स्वीकारलेल्या सीमा शुल्काची अतिरिक्त रक्कम भरली आहे :

तर असा कोणताही अर्ज केला जाणार नाही.

परंतु पुढे असे की, अपीलीय न्यायाधिकरणात किंवा कोणत्याही न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांमध्ये, या पोट- कलमांतर्गत जमाबंदी आयोगाकडून कोणताही अर्ज ग्राह्य धरला जाणार नाही : परंतु असेही की, कलम १२३ लागू असलेल्या वस्तूंसंदर्भात किंवा अंमली औषधिद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ अधिनियम, १९८५ (सन १९८५ चा अधिनियम क्र. ६१) अंतर्गत कोणताही गुन्हा केलेल्या वस्तूंसंदर्भात, या पोट-कलमान्वये कोणताही अर्ज केला जाणार नाही : परंतु असेही की, सीमाशुल्क अधिनियम, १९७५ (सन १९७५ चा अधिनियम क्र. ५१) अंतर्गत वस्तूंच्या वर्गीकरणाच्या स्पष्टीकरणासाठी या पोट-कलमान्वये कोणताही अर्ज केला जाणार नाही."

(यावर भर देण्यात आला आहे.)

२०. याचिकाकर्त्याचा युक्तिवाद असा आहे की, समझोत्यासाठी प्रस्तुत प्रकरणात अधिनियमाचे कलम १२३ लागू होणार नाही, कारण हरित मार्गिका ओलांडल्यानंतर सीमा शुल्क क्षेत्रात प्रवेशित परदेशी माल जप्त केला जातो. याचिकाकर्त्याने **भारत सरकार विरुद्ध सुरेश रहेजा, २०११ (२६७) ई. एल. टी. ४८७ (बॉम्बे)** या प्रकरणातील मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयावर भिस्त ठेवली आहे, ज्यामध्ये उच्च न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की, ज्या परिस्थितीत मालाच्या उत्पत्तीबद्दल कोणताही वाद नाही, अशा

परिस्थितीत कलम १२७ ब च्या परंतुकामध्ये समाविष्ट असलेला रोध हा कलम १२३ अंतर्गत निर्दिष्ट मालाच्या बाबतीत आड येणार नाही.

२१. शिवाय, याचिकाकर्त्याचा युक्तिवाद असा आहे की, वैधानिक हेतू समझोत्यासाठी मुक्त द्वार उघडणे आहे आणि प्रकरणांचा निपटारा रोखणाऱ्या यांत्रिक पद्धतीने लाभकारी तरतुदींचा कठोर अर्थ लावणे नाही.

विश्लेषण आणि कारणमीमांसा

२२. ही अधिनियमाची योजना आणि सोपी रचना आहे. कलम १२७ ब आणि १२३ चे सरळ वचन केल्यास हे स्पष्ट होते की, कलम १२७ ब (१) च्या परंतुकानुसार, जमाबंदी आयोगाच्या अधिकारितेमध्ये काही विशिष्ट प्रकारच्या वस्तूंना रोध आहे. यामध्ये कलम १२३ अन्वये नमूद केलेल्या वस्तू आणि एनडीपीएस अधिनियमाशी संबंधित वस्तूंचा समावेश आहे. त्यामुळे वरीलपैकी कोणत्याही मालाचा समावेश असल्यास कलम १२७ ब चा आधार घेता येणार नाही.

२३. मालाच्या उत्पत्तीविषयी कोणताही वाद नसला तरीसुद्धा, कलम १२३ अन्वये गणल्या गेलेल्या वस्तूंच्या संदर्भात समझोत्यासाठी अधिनियमाचे कलम १२७ ब लागू होणार नाही, कारण हे कलम १३५ अन्वये, प्रस्तुत प्रकरणात आरोप केल्याप्रमाणे, कर चुकविण्यासारखे काही गुन्हे केल्याबद्दल केलेल्या दंडात्मक परिणामांच्या वैधानिक योजनेच्या विरोधात आहे.

२४. म्हणून, सर्व प्रकरणे समझोत्याद्वारे निकाली काढण्याचा वैधानिक हेतू आहे, हा याचिकाकर्त्याचा युक्तिवाद ग्राह्य धरता येणार नाही.

२५. शिवाय, कलम १२७ ब मध्ये त्याच्या अंमलबजावणीसाठी विशिष्ट अटी घालण्यात आल्या आहेत आणि परंतुकामध्ये ज्यामध्ये समझोता करता येणार नाही, अशा वस्तूंचे प्रकार नमूद करण्यात आले आहेत. यावरून हे स्पष्ट होते की, कलम १२७ ब सर्व प्रकारच्या प्रकरणांमध्ये लागू होणार नाही. फक्त खालील परिस्थितीतच जमाबंदी आयोगाकडे अर्ज करता येऊ शकतो :

अ) अर्जदाराने अशा वस्तूंच्या आयात किंवा निर्यातीसंदर्भात माल नोंदपत्र, किंवा यथास्थिती शिपिंग बिल दाखल केले आहे आणि अशा माल नोंदपत्र किंवा शिपिंग बिलाच्या संदर्भात, योग्य अधिकाऱ्याने त्याला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे ;

ब) अर्जदाराने आपल्या अर्जात स्वीकारलेल्या शुल्काची अतिरिक्त रक्कम तीन लाख रुपयांपेक्षा जास्त आहे ; आणि

क) अर्जदाराने कलम २८ एबी अंतर्गत देय व्याजासह त्याने स्वीकारलेल्या सीमा शुल्काची अतिरिक्त रक्कम भरली आहे : आणि

ड) कलम १२७ ब चे परंतुक लागू होत नाही.

२६. शिवाय, वर चर्चा केल्याप्रमाणे, अधिनियमाच्या योजनेत प्रकरण सोळा

अंतर्गत गणल्या गेलेल्या गुन्ह्यांसाठी दंड भरणे आणि / किंवा तुरुंगवास यांचा समावेश आहे. या अधिनियमांतर्गत सर्व गुन्ह्यांना कलम १२७ ब अन्वये जमाबंदी आयोगासमोर जाण्याची परवानगी देता येत नाही. यामुळे कलम १२७ ब चे परंतुक, ज्याद्वारे कलम १२३ अन्वये नमूद केलेल्या विशिष्ट वस्तूंसह आणि अंमली औषधिद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ अधिनियम, १९८५ अन्वये प्रतिबंधित असलेल्या वस्तूंवर प्रतिबंध आहे, त्या परंतुकाचा वैधानिक हेतू अनावश्यक ठरेल. महत्त्वाचे म्हणजे, असे स्पष्टीकरण स्वीकारल्याच्या परिणामी, कलम ११ अन्वये भारताची सुरक्षा राखण्यासाठी वस्तूंच्या आयातीवर बंदी घालण्याचा अधिकार, कलम १०५ अन्वये अटकेचे अधिकार, कलम १०८ अन्वये समन्स बजावण्याचा अधिकार, कलम १११ अन्वये जप्ती आणि कलम १३२ ते कलम १३५ अन्वये ज्या गुन्ह्यांसाठी तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते, अशा कलमांना ते लागू होणार नाही आणि त्यामुळे संबंधित वैधानिक तरतुदींचा परिणाम शून्यबातल होईल. याचिकाकर्त्याने विनंती केल्याप्रमाणे, अशा स्पष्टीकरणामुळे, घोषित न करता माल आयात करणाऱ्या व्यक्तीस सहजगत्या कलम १२७ ब चा आधार घेऊन जप्ती आणि फौजदारी खटला टाळण्याची परवानगी मिळेल. फौजदारी खटल्याचा प्रतिबंध सुद्धा निष्फळ ठरेल.

यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयाने व्यक्त केलेल्या दृष्टिकोनाच्या विपरीत भूमिका दिल्ली उच्च न्यायालयाने घेतल्याचे निदर्शनास आले आहे.

२६.१ अतिरिक्त सीमा शुल्क आयुक्त वि. राम निवास वर्मा, २०१५ एससीसी ऑनलाइन दिल्ली ११५४२ (दिल्ली उच्च न्यायालयाचे २ न्यायाधीशांचे खंडपीठ), या

प्रकरणात त्यातील उत्तरवादीकडून ६४५२ ग्रॅम सोने जप्त करण्यात आले होते. तो हरित मार्गिका ओलांडत होता, पण सीमाशुल्क अधिकाऱ्याने त्याला अडवले. कलम १२३ ज्या वस्तूंना लागू होते, त्या वस्तूंशी संबंधित असल्यास समझोत्यासाठी कोणताही अर्ज करता येणार नाही, हे स्पष्ट आहे, असे न्यायालयाने नमूद केले.

२६.२ सीमा शुल्क आयुक्त विरुद्ध अविनाश दावर आणि अन्य एक, २०१५ एससीसी ऑनलाइन दिल्ली १३८७५ (दिल्ली उच्च न्यायालयाचे २ न्यायाधीशांचे खंडपीठ) या प्रकरणात जमाबंदी आयोगाने असा निर्णय दिला आहे की, अवैध आयातीची कबुली असल्यामुळे सीमा शुल्क अधिनियमाच्या कलम १२३ अन्वये योजल्यानुसार शाबीतीचा भार हलविण्याची आवश्यकता नाही. हा आदेश रद्दबातल ठरवताना सर्वोच्च न्यायालयाने असे नमूद केले की, तरतुदींचे सरळ वाचन केल्यावर, 'सोन्या'च्या संदर्भात कलम १२७ ब अन्वये अर्ज करता येणार नाही, जी कलम १२३ अन्वये विनिर्दिष्टरीत्या सूचीबद्ध वस्तू आहे.

२६.३ रामनिवास वर्मा (उपरोल्लेखित) आणि **अविनाश डावर (उपरोल्लेखित)** मधील निर्णयांचे पालन **सीमा शुल्क आयुक्त वि. ज्योत्स्ना चिकेरसाळ आणि अन्य एक, २०१९ एससीसी ऑनलाइन दिल्ली ६५७४** (दिल्ली उच्च न्यायालयाचे २ न्यायाधीशांचे खंडपीठ) या प्रकरणांत करण्यात आले आहे, ज्यात त्यातील उत्तरवादीकडून सोन्याच्या ६ लगडी हस्तगत करण्यात आल्या होत्या. किनाऱ्यावर उतरण्याच्या स्लिपमध्ये किंवा सीमाशुल्क क्षेत्रात काहीही घोषित किंवा खुलासा करण्यात आला नव्हता. न्यायालयाने असा निर्णय दिला की, या दोन तरतुदींचे एकत्रित वाचन केल्यास, कलम १२३ (२) मध्ये

नमूद केलेल्या वस्तूंशी संबंधित प्रकरणे समझोत्याद्वारे निकाली काढण्याचे आयोगाचे अधिकार क्षेत्र वगळण्यात आल्याचे स्पष्ट होते.

२६.४ महत्त्वाचे म्हणजे, दिल्ली उच्च न्यायालयाने **सीमा शुल्क आयुक्त वि. अशोककुमार जैन, २०१३ (२९२) ईएलटी ३२ (दिल्ली)** या प्रकरणात, ज्यात हस्तगत केलेल्या घड्याळांसाठी कलम १२७ ब अंतर्गत समझोत्याचा अर्ज मंजूर केला होता आणि या प्रकरणामध्ये आणि वर नमूद केलेल्या प्रकरणांमध्ये, सदर निर्णयामध्ये कलम १२३ आणि त्यातील त्याअनुषंगाने असलेला प्रतिबंध विचारात घेण्यात आला नव्हता, या कारणास्तव भेद दर्शविण्यात आला.

२६.५ सुरेश रहेजा (उपरोल्लेखित) या प्रकरणामधील कारणमीमांसा ही त्या प्रकरणातील तथ्ये आणि वस्तुस्थितीमध्ये विचारात घेऊन करण्यात आली होती, ज्यामध्ये घड्याळांसह संपूर्ण सामान ओले झाले होते आणि पुरामुळे प्रभावित झाले होते.

२७. प्रस्तुत प्रकरणात, याचिकाकर्त्याकडून दिनांक ०५.१०.२०२२ रोजी दिल्ली विमानतळावरील हरित मार्गिका ओलांडत असताना हस्तगत करण्यात आले होते, ज्यामध्ये तपास यंत्रणेच्या अधिकाऱ्यांनी त्याला परदेशी घड्याळांसह शुल्कयोग्य वस्तूंसह पकडले. घड्याळ हे अधिनियमाच्या कलम १२३ मध्ये नमूद केलेल्या वस्तूंच्या वर्गवारीपैकी एक आहे. कलम १२३ लागू असलेला माल हस्तगत करण्यात आला असल्यामुळे याचिकाकर्त्याला जमाबंदी आयोगाकडे जाण्यास प्रतिबंध आहे. माझ्या मते हे प्रकरण कायद्यानुसार योग्य ती

कारवाई करण्यासाठी अभिनिर्णय प्राधिकाऱ्यांकडे पाठविण्यासाठी योग्य आहे.

अनुच्छेद ३२ अन्वये रिट अधिकार क्षेत्र

२८. वादाच्या गुणवत्तेनुसार मी कायद्याचा विचार केला आहे ; तथापि, याचिकाकर्त्याने भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ३२ चा वापर केल्यामुळे सध्याच्या कार्यवाहीच्या दाखलयोग्यतेचा विचार करणे सुद्धा आवश्यक आहे.

२९. हा सुस्थापित कायदा आहे की, राज्यघटनेच्या अनुच्छेद ३२ अन्वये मूलभूत अधिकारांचे उल्लंघन होत असल्याचा आरोप झाल्यास या न्यायालयाला व्यापक अधिकार आहेत. परंतु, असा हस्तक्षेप प्रकरणपरत्वे आणि मूलभूत अधिकारांचा प्रश्न उद्भवल्यानंतरच केला पाहिजे.

३०. **नॉर्दर्न कॉर्पोरेशन वि. भारत सरकार, (१९९०) ४ एससीसी २३९** (२ न्यायाधीशांचे खंडपीठ) या प्रकरणात, सीमाशुल्क अधिनियमातील तरतुदींच्या अंमलबजावणीचा मुद्दा हाताळताना या न्यायालयाने अनुच्छेद ३२ अन्वये दाखल केलेल्या याचिकेत असे निरीक्षण नोंदविले आहे की, कायद्यानुसार आयात केलेला कोणत्याही मालास परवानगी देण्याचा याचिकाकर्त्याला मूलभूत अधिकार नाही. शिवाय, असा निर्णय देण्यात आला की, कायद्यातील तरतुदींची अंमलबजावणी केल्यास मूलभूत अधिकारांचे उल्लंघन होईल आणि त्यामुळे एखाद्या नागरिकाला राज्यघटनेच्या अनुच्छेद ३२ चा आधार घेण्याचा अधिकार मिळेल, असा युक्तिवाद करता येणार नाही. म्हणून, रिट याचिका

फेटाळण्यात आली.

३१. **दलीप सिंग वि. उत्तर प्रदेश राज्य आणि इतर, (२०१०) २ एससीसी ११४** (२ न्यायाधीशांचे खंडपीठ) या प्रकरणात, सर्व तथ्ये समोर ठेवणे आणि योग्य तो दिलासा मागणे या अनिवार्य स्वरूपाचा पुनरुच्चार करण्यात आला.

३२. याचिकाकर्त्याने रिट याचिका क्र. ५५/२०२३ द्वारे या न्यायालयात धाव घेतली आणि केवळ, न्यायचौकशीअधीन कैद्यांना घरच्या जेवणासाठी महादेश प्राधिलेख मंजूर करण्याचीच (हा प्रश्न इतर रिट याचिकांमध्ये या न्यायालयाच्या विचाराधीन आहे) विनंती केली. त्यानंतरच सध्याच्या वादाच्या गुणवत्तेसंदर्भात, म्हणजेच उत्तरवादी क्र. २ (सीमाशुल्क प्राधिकारी) यांना सीमाशुल्क अधिनियम, १९६२ च्या कलम १२७ ब अन्वये समझोत्यासाठी निर्देश देण्यासाठी, दिलासा मागण्याकरिता वादकालीन अर्ज दाखल करण्यात आला.

३३. याचिकाकर्त्याने घेतलेला हा दृष्टिकोन हा, माझ्या मते, योग्य पर्यायी उपाय न केल्यामुळे दुर्भावनापूर्ण नसेल तर, अयोग्य आणि अनिष्ट आहे. मूलभूत हक्कांशी संबंधित मदतीच्या नावाखाली तात्कालिक आयएमध्ये म्हणजेच समझोत्याच्या अर्जावर निर्णय घेण्यासाठी मागितला जाणारा दिलासा, हा अधिनियमांतर्गत वैधानिक स्वरूपाचा आहे.

३४. ज्या प्रकरणांमध्ये याचिकाकर्त्याच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन झाले आहे, अशा प्रकरणांमध्ये या न्यायालयात जाण्याच्या मूलभूत अधिकाराचा आधार घेण्यास

परवानगी देणे आवश्यक आहे. यात असे कोणतेही उल्लंघन झाल्याचे सिद्ध झालेले नाही. घटनात्मक आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या पद्धतीने सीमाशुल्क विभागाने कारवाई केली आहे असे दर्शविणारी कोणतीही सामग्री अभिलेखावर सादर करण्यात आलेली नाही.

३५. त्यामुळे वरील बाबी लक्षात घेता, प्रस्तुत अर्ज दाखलयोग्यतेच्या मुद्द्यावर फेटाळण्यास पात्र आहे. अनुच्छेद ३२ च्या अधिकाराचा वापर करण्यासाठी सुस्थापित तत्त्वांची पायमल्ली करण्याच्या प्रथेला प्रोत्साहन देता कामा नये, ही बाब सुद्धा लक्षात घेतली पाहिजे.

वरील अटींनुसार, वादकालीन अर्जांसह रिट याचिका निकाली काढण्यात येत आहे.

x-x-x-x

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x